॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर ■ बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ७८ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 ■ 9420802145

*** सुविचार ***

यश त्यांचं असतं,
जे प्रयत्न थांबवत नाहीत.

## वीरभूमी फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### कौतुक

सरकार करेल सगळं
आपण काय करायचं?
कांद्याला भाव दिला
कौतुक पण करायच!
चुकीच्या ठिकाणी टीका
चांगले असेल तर कौतुक
बेधडक मांडायच्या भावना
कायम राहायचं नसत मूक

## SPOT NEWS

### पंतप्रधान मोदींच्या सुरक्षेत चूक

**मुंबई** – येथील वांद्रे-कुर्ला संकुल येथील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम ज्या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता, त्याच कार्यक्रमाच्या आवारातून मुंबई पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. यातील एका संशयिताकडे बंदूक मिळून आल्याने आणि तो स्वत:ला थेट पंतप्रधान कार्यालयाचा वरिष्ठ अधिकारी सांगत असल्याने सुरक्षा यंत्रणांचे धाबे दणाणले आहेत. मुंबई पोलिसांनी एनएमएसीसी सेंटरमधून रोहन पारेख नावाच्या २४ वर्षीय युवकाला ताब्यात घेतले आहे. रोहन पारेख हा एनएमएसीसी परिसरात अत्यंत रुबाबात वावरत होता आणि स्वत:ला पीएमओ कार्यालयाचा अधिकारी असल्याचे सांगत होता. मात्र, कार्यक्रमाच्या सुरक्षेवर तैनात असलेल्या विशेष सुरक्षा रक्षकांनी आणि पोलिसांनी जेव्हा त्याच्या संशयास्पद हालचाली पाहून तपासणी केली, तेव्हा त्याने दाखवलेले पंतप्रधान कार्यालयाचे ओळखपत्र पूर्णपणे बनावट असल्याचे उघडकीस आले. सुरक्षा यंत्रणांना समजले की, २४ वर्षांचा रोहन पारेख हा एकटा नाही तर स्वत:सोबत एका खासगी बॉडीगार्डला घेऊन फिरत होता. त्याच्यासोबत असलेल्या या बॉडीगार्डकडे एक बंदूक देखील मिळून आली आहे.

# जरांगे पाटलांची तब्येत खालावली

**उपोषणाचा अकरावा दिवस । शुगर लेव्हल आणि रक्तदाबदेखील कमी झाला**

**जालना । वीरभूमी** – मराठा आरक्षणाबाबत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या १० दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. अशामध्ये मंगळवारी (८ सप्टेंबर) उपोषणाच्या अकराव्या दिवशी त्यांची तब्येत जास्तच खालावल्याची माहिती समोर आली. सततच्या उपोषणांमुळे त्यांचे वजन हे तब्बल ७ किलोंनी घातले आहे. तसेच, त्यांची शुगर लेव्हल आणि रक्तदाबदेखील कमी झाला आहे. अशामध्ये, त्यांच्या तब्येतीची बातमी कळताच सरकारकडील काही नेत्यांनी त्यांना ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री फोन केल्याची माहितीही समोर आली आहे.



८ सप्टेंबर रोजी पहाटे मनोज जरांगे पाटलांची तब्येत अचानक खालावल्याचे समोर आले. त्यांचे वजन कमी झाले असून शुगर आणि बीपी देखील कमी झाला. जालना येथील सिव्हिल सर्जन यांनी सोमवारी (७ सप्टेंबर) मध्यरात्री २.३० वाजता तपासणी केली. तसेच त्यांना वारंवार चक्कर येत असल्याचेही तपासानंतर समोर आले आहे. अशामध्ये, सोमवारी दुपारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली होती. तेव्हाही बोलताना त्यांना उलट्या झाल्या असल्याचे यावेळी समोर आले.

समोर आलेल्या माहितीनुसार, मनोज जरांगे पाटलांची तब्येत बिघडल्याचे कळताच सोमवारी रात्री २.३० वाजता मंत्री उदय सामंत आणि प्रसाद लाड यांनी फोन करून त्यांची विचारपूस केली. तसेच, त्यांना विनंती केल्यानंतर मनोज जरांगे यांनी रात्री २.३० नंतर सलाईन घेतले. रात्री त्यांना ४ सलाईन लावण्यात आले असून शुगर लेवल आणि वजन कमी झाल्यामुळे मनोज जरांगे यांचा त्रास वाढला होता.

# 'जेन झी'चा गणेशोत्सवात नाशिक ते मुंबई 'लाँग मार्च'

**नाशिक । वीरभूमी** – आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, प्रधान सचिव, आदिवासी आयुक्त हटाव या मागणीसाठी आदिवासी विद्यार्थी जेन झी मुंबईला धडकणार हे निश्चित झाले असून, नाशिक ते मुंबई असा लाँग मार्च (पायी मोर्चा) असणार आहे.

दि. १६ ते २० म्हणजे गणेशोत्सव काळात हा मोर्चा मुंबईला जाणार आहे. मोर्चाची राज्यभर व्याप्ती वाढवण्यासाठी आंदोलक जिल्हानिहाय बैठका घेऊन गावागावांत, वसतिगृह, आश्रमशाळांवर जाऊन जनजागृती करणार आहेत.

सकल आदिवासी विद्यार्थी आंदोलन कृति समितीची महत्त्वाची बैठक नाशिक येथे झाली. बैठकीस विद्यार्थी, विद्यार्थी प्रतिनिधी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात आली.

आंदोलनाची धग कायम रहावी यासाठी लवकरात लवकर मोर्चा काढण्यात यावा, अशी मागणी झाली. त्यावर १६ ते २० सप्टेंबर याच कालावधीतील तारीख निश्चित केली जाईल, ही तारीख राज्यभरातील समन्वयकांची बैठक घेऊन अंतिम केली जाणार आहे.

नाशिक येथून हा मोर्चा मुंबईला निघेल. त्यासाठीचे नियोजन महाराष्ट्रातील विद्यार्थी प्रतिनिधी व विविध विद्यार्थी संघटनांसोबत समन्वय साधून करण्याबाबत चर्चा झाली. आंदोलनाची व्याप्ती महाराष्ट्रात वाढवण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी, विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांना एकत्रित बैठक घेऊन पुढील आंदोलनाचे नियोजन करण्याचा निर्णय यावेळी झाला.

# अपात्र शिक्षकांच्या नियुक्तीवर 'सर्वोच्च' बंदी

**नवी दिल्ली । वीरभूमी** – शिक्षक भरतीबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा अंतरिम आदेश दिला असून राइट टू एज्युकेशन (आरटीई), नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (एनसीटीई) आणि युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन (यूजीसी) कायद्यांतर्गत निर्धारित पात्रता नसलेल्या व्यक्तींना शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून नियुक्त करण्यास किंवा कामावर ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्वरूपात बंदी घातली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठाने राजेश चौहान यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि यूजीसी यांना नोटीस बजावत हा आदेश दिला. या जनहित याचिकेत खासगी किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या शिक्षण संस्थांमधील शिक्षक व कर्मचा-यांना निष्पक्ष, पारदर्शक आणि स्पर्धात्मक भरती प्रक्रिया न राबवता थेट सरकारी सेवेत सामावून घेण्याची परवानगी देणारी कोणतीही कायदेशीर योजना असंवैधानिक घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे एनसीटीई किंवा यूजीसी कायद्यांतर्गत आवश्यक पात्रता नसलेल्या शिक्षकांच्या नोकरीवर संकट निर्माण झाले आहे. आरटीई कायद्याच्या कलम २३ अंतर्गत एनसीटीईकडून शिक्षकांसाठी किमान पात्रता निश्चित केली जाते. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिकवण्यासाठी डी.एल.एड./बी.एड.सह शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. एनसीटीईच्या निकषांनुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी बारावीमध्ये किमान ५० टक्के गुणांसह डी.एल.एड./बी.एल.एड. आणि टीईटी, तर सहावी ते दहावीसाठी पदवी, बी.एड. आणि टीईटी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# गरबा उत्सवावरून भाजपमध्येच मतभेद?

**मुंबई । वीरभूमी** – सत्ताधारी महायुतीमधील भाजप मंत्री नितेश राणे यांनी गरबा उत्सवात मुस्लिमांना प्रवेश देऊ नये, अशी भूमिका घेतली आहे. त्यांच्या या भूमिकेवरून राजकीय वर्तुळात चर्चांना तोंड फुटले आहे. या चर्चांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मंत्री राणे यांच्यापेक्षा वेगळी भूमिका मांडली आहे. एकप्रकारे मंत्री राणेंच्या भूमिकेला छेद देणारी प्रतिक्रिया दिली आहे.

काही दिवसांपूर्वी भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी गरब्यात मुस्लिमांना प्रवेश देण्यास विरोध केला होता. जर मुस्लिमांना गरब्यामध्ये यायचे असेल तर त्यासाठी धर्मांतराची अट घातली होती. यावर विरोधक तसेच काही मुस्लिम संघटनांनी आक्षेप घेतला होता. यामुळे गरबा-दांडियावरून महाराष्ट्रात राजकारण चांगलेच तापले आहे. अशामध्ये आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी याबाबत एक मोठे आणि महत्त्वाचे विधान केले आहे.

अमृता फडणवीस यांनी, 'गरबा सर्वसमावेशक उत्सव असून, तो पाहण्यासाठी किंवा त्याचा आनंद घेण्यासाठी मुस्लिम व्यक्ती येत असेल, तर त्यात गैर काहीही नाही,' अशी भूमिका मांडली. चंद्रपुरातील महाशिवलिंग मंदिरात आयोजित रुद्राभिषेकासाठी अमृता फडणवीस उपस्थित होत्या. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी गरबा, दहीहंडी, सार्वजनिक उत्सव आणि डीजेच्या वापराबाबतही भूमिका स्पष्ट केली.

गरबा सर्वांसाठी खुला उत्सव आहे. एखादी मुस्लिम व्यक्ती गरबा पाहण्यासाठी किंवा त्याचा आनंद घेण्यासाठी येत असेल, तर त्याला विरोध करण्याचे कारण नाही, असे फडणवीस म्हणाल्या. श्रद्धा, धर्माचे पालन घरात करावे, सार्वजनिक ठिकाणी मात्र सर्वांनी सामाजिक सलोखा आणि नियमांचे भान ठेवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# उपवर्गीकरणाविरोधातील लढा अधिक तीव्र करणार

**आनंदराज आंबेडकर । चर्मकार समाजातील गुणवंत व शिक्षकांचा गुणगौरव**

**अहिल्यानगर । वीरभूमी** – शिक्षकांना सरकारी कामांसाठी राबवून घेणे आणि हक्काची वेठबिगारी असल्याप्रमाणे त्यांच्याकडे पाहणे ही दुर्दैवी बाब आहे. शिक्षकांचा सन्मान राखला गेला पाहिजे. यासाठी संपूर्ण समाज शिक्षकांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी केले. तसेच अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधातील लढा आगामी काळात अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

चर्मकार विकास संघ, अहिल्यानगर, रविदासिया फाउंडेशन, मुंबई आणि लोकनेते माजी आमदार सितारामजी घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात जिल्ह्यातील चर्मकार समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आंबेडकर बोलत होते.

चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार काशिनाथ दाते, संदीपदादा घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर, युवा नेते अमन आंबेडकर, महिला व बालकल्याणचे बालाजी सोनटक्के, तुकाराम शेंडे, सुभाष मराठे, नगरसेवक सुरेश बनसोडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष सर्जेराव गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आनंदराज आंबेडकर म्हणाले की, चर्मकार समाज आता आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरू लागला आहे. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात समाजाने एकजूट दाखविली आहे. संजय खामकर यांनी विविध मोर्चांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून दिलेले आरक्षण कमी करण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. अनुसूचित जातींच्या ५९ जातींची एकजूट अबाधित ठेवण्यासाठी हा संघर्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात भीमगीताने झाली. पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, संत रविदास महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन झाले.

प्रास्ताविकात संतोष कानडे यांनी मागील १५ वर्षांपासून समाजातील गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षकांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला जात असल्याचे सांगितले. संस्थेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

अनुसूचित जातींच्या ५९ जातींची एकजूट कायम ठेवण्यासाठी उभारलेल्या जनआंदोलनाबद्दल आनंदराज आंबेडकर यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. मानपत्राचे वाचन कवी सुभाष सोनवणे यांनी केले.

यावेळी इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थी, पदवीधर, अभियंते, डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी, एमपीएससी-यूपीएससी तसेच अन्य स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेले विद्यार्थी, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे युवक-युवती आणि आदर्श शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



संजय खामकर म्हणाले की, या उपक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी गुणवंतांचा गौरव करून शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे काम केले जाते. ज्येष्ठ साहित्यिक सोनाग्रा यांच्या स्मरणार्थ गुणवंतांना दीड लाख रुपयांची पुस्तके देण्यात आली असून, त्यातून सामाजिक विचार रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शिक्षकांना नवीन पिढीकडून अपेक्षित सन्मान मिळत नसल्याची खंत व्यक्त करत त्यांनी शिक्षकांचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर यांनी बदलत्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांवर विविध प्रकारची कामे सोपविली जात असल्याचे सांगत सध्याच्या शिक्षण व्यवस्थेवर भाष्य केले.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, सरकार शिक्षकांवर विश्वास ठेवून विविध शिक्षकेतर कामांची जबाबदारी सोपवते. प्रशासनाचा गाडा चालविण्यात शिक्षकांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गुणगौरव होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी संघर्ष आणि परिश्रमातूनच यश मिळते, असे सांगत युवकांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. समाजातील पारंपरिक व्यवसाय बदलत्या काळात अडचणीत आले असून, प्रगतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे, असेही त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती केलेल्यांनी इतरांना शिक्षणासाठी मदतीचा हात द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच संत रोहिदास भवन येथील स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेसाठी २५ लाख रुपये निधी देण्याची घोषणा केली.

कार्यक्रमास संदीपदादा घनदाट, अमन आंबेडकर, बालाजी सोनटक्के, सुभाष मराठे, सुरेश बनसोडे, मधुकर घनदाट, रामराव ज्योतिक, मच्छिंद्र दळवी, आशा मराठे, प्रतिभा खामकर, अण्णासाहेब खैरे, संतोष कानडे, सुरेश शेवाळे, अरुण गाडेकर, सुभाष सोनवणे, संजय कानडे, राजेंद्र धस, सुनील धस, रामदास सातपुते, भारत चिंधे, रामदास सोनवणे, रुक्मिणी नन्नवरे, हेमलता कांबळे, जयश्री पोटे, मनीष कांबळे, दिलीप कांबळे, रुपेश लोखंडे, मनोज गंवादे व कारभारी देव्हारे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष कानडे यांनी केले, तर आभार सर्जेराव गायकवाड यांनी मानले.

## SPOT NEWS

### ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात रंगणार शिवशाहीर सुनील चिंचोलीकर यांचे पोवाडे

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
निमगाव वाघा (ता. नगर) येथे गुरूवारी (दि. १० सप्टेंबर) शिक्षक दिनाचे औचित्य साधून आठव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. साहित्य, संस्कृती आणि सामाजिक प्रबोधनाचा संगम घडविणाऱ्या या संमेलनात नेवासा येथील प्रसिद्ध शिवशाहीर सुनील चिंचोलीकर यांच्या पोवाड्याचे विशेष आकर्षण राहणार असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यानंतर शिवशाहीर सुनील चिंचोलीकर यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम रंगणार आहे. आपल्या प्रभावी आवाजातून आणि जोशपूर्ण शैलीत ते व्यसनमुक्तीचा संदेश देणारा पोवाडा सादर करणार आहेत. मनोरंजनासोबतच सामाजिक प्रबोधन करण्याच्या उद्देशाने त्यांच्या सादरीकरणातून युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे, निरोगी व सकारात्मक जीवनशैली स्वीकारावी, असा संदेश दिला जाणार आहे. शिवशाहीर चिंचोलीकर यांच्या सादरीकरणात केवळ व्यसनमुक्तीचा संदेशच नव्हे, तर महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहास आणि संतपरंपरेचे दर्शनही घडणार आहे. ते महाराष्ट्राची शौर्यगाथा, संत तुकाराम महाराज तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित पोवाडे सादर करणार आहेत. पोवाडा ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील प्रभावी आणि जनजागृतीचे सामर्थ्य असलेली लोककला आहे.

### विकसित भारत युवा नेतृत्व संवाद २०२७ अंतर्गत ‘विकसित भारत प्रश्नमंजुषा’ स्पर्धेचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत युवकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी केंद्र शासनाच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने ‘विकसित भारत युवा नेतृत्व संवाद २०२७’ आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाची सुरुवात ‘विकसित भारत प्रश्नमंजुषे’ने झाली असून १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवतींना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत MY Bharat पोर्टलवर ऑनलाइन सहभागी होता येणार आहे. प्रश्नमंजुषा विविध भारतीय भाषांमध्ये आयोजित करण्यात येत असून जिल्ह्यातील युवकांना यात सहभागी होण्याचे आवाहन मेरा युवा भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष यांनी केले आहे. VBYLD २०२७ अंतर्गत युवकांच्या निवडीची प्रक्रिया प्रश्नमंजुषा निबंध आव्हान जिल्हास्तरीय स्पर्धा राज्य/केंद्रशासित प्रदेशस्तरीय VBYLD राष्ट्रीय तइधडऊ अशा टप्प्यांत होणार आहे. प्रश्नमंजुषेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागी युवकांना पुढील ‘विकसित भारत निबंध आव्हाना’साठी पात्र ठरण्याची संधी मिळणार आहे. त्यानंतर निवड झालेल्या युवकांमधून जिल्हास्तरावर सादरीकरणासाठी निवड केली जाईल. प्रत्येक जिल्ह्यातील उत्कृष्ट सादरकर्त्यांना राज्यस्तरीय तइधडऊ मध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. जिल्हास्तरीय स्पर्धा १० ते १६ नोव्हेंबर २०२६, तर राज्य/केंद्रशासित प्रदेशस्तरीय तइधडऊ १७ नोव्हेंबर ते ७ डिसेंबर २०२६ या कालावधीत होणार आहे. या निवड प्रक्रियेतील उत्कृष्ट युवकांना १० ते १२ जानेवारी २०२७ रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय VBYLD मध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

# पाथर्डी तालुक्यात तातडीने दुष्काळ जाहीर करा

## महाविकास आघाडीचे तहसीलदारांना निवेदन | नुकसानभरपाई, चारा छावण्या, पाणीपुरवठासह ११ मागण्या

**● पाथर्डी । वीरभूमी –**
पाथर्डी तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, तसेच शेतकरी व नागरिकांना तातडीने दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव तहसील कार्यालयात उपस्थित होते. यावेळी तहसीलदारांना निवेदन देऊन तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीकडे शासनाचे तातडीने लक्ष वेधण्यात आले.

तालुक्यात यंदा समाधानकारक पाऊस न झाल्याने अनेक गावांमध्ये पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. पावसाअभावी खरीप पिके करपली असून, फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत व बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पाथर्डी तालुका तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा, करपलेल्या पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, फळबागांसाठी दुष्काळी अनुदान जाहीर करावे, तसेच जनावरांसाठी चारा डेपो अथवा चारा छावण्या तातडीने सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय वांबोरी चारीतून लाभार्थी गावांना पाणी सोडावे, रोजगार हमी योजनेंतर्गत बंद असलेली सामुदायिक व वैयक्तिक कामे तातडीने सुरू करून लाभार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

जलजीवन मिशनअंतर्गत कामे पूर्ण न झालेल्या गावांमध्ये तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा. भगवानगडसह ४६ गावांच्या नळपाणी पुरवठा योजनेची कामे गेल्या काही वर्षांपासून सुरू असून, ती तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. तसेच पाथर्डी शहराच्या पाणीपुरवठा योजनेचे काम संथगतीने सुरू असल्याने त्याला गती देऊन शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

तालुक्यातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. तसेच दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची सर्व प्रकारची शैक्षणिक फी माफ करावी, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी नगरसेवक देवा पवार, बंडु बोरुडे, सिताराम बोरुडे, दिगंबर गाडे, योगेश रासने, अक्रम आतार महादेव दहिफळे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अगस्ती विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त
## २२४ विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षक, मुख्याध्यापकांच्या भूमिका

**● अकोले । वीरभूमी–**
अगस्ती विद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षकांची भूमिका साकारत विविध शैक्षणिक उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या उपक्रमात तब्बल २२४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या भूमिका प्रभावीपणे पार पाडत विद्यालयातील दैनंदिन शैक्षणिक कामकाजाचा अनुभव घेतला. या अनोख्या उपक्रमामुळे संपूर्ण विद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सतीश नाईकवाडी सर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संजय शिंदे होते. विद्यार्थ्यांमधून प्रणिता दराडे यांनी मुख्याध्यापिका, पलक आवारी यांनी उपमुख्याध्यापिका, तर ऋतिका सुपे यांनी पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली.

मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगताना, शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारताना शिस्त, जबाबदारी, नियोजन व नेतृत्वगुणांचा अनुभव घेतल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वक्षमता, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी ज्योती पोखरकर, स्वाती झरेकर, अर्णव सोनवणे व श्रावणी आदमाने यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा हा उपक्रम संस्मरणीय ठरला. सूत्रसंचालन प्रणिता दराडे व पलक आवारी यांनी केले.

## मॉडर्न कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गिरवले लोकशाहीचे धडे

### विद्यार्थी मंडळ निवडणूक | श्रुती नवले, गणेश गोसावी प्रतिनिधीपदी विजयी

**● अकोले । वीरभूमी –**
येथील मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थी मंडळाची निवडणूक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना भविष्यातील निवडणूक प्रक्रिया समजावी, तसेच त्यांनी कर्तव्यदक्ष मतदार व जबाबदार नागरिक बनावे, या उद्देशाने दरवर्षी विद्यालयात हा उपक्रम राबविला जातो.



मतदार यादी प्रसिद्ध करणे, निवडणूक कार्यक्रम जाहीर करणे, अधिसूचना काढणे, उमेदवारी अर्ज दाखल करणे व माघार घेणे, अर्जांची छाननी, चिन्ह वाटप, प्रचार, प्रत्यक्ष मतदान आणि फेरीनिहाय निकाल जाहीर करणे, या संपूर्ण प्रक्रियेचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

विद्यार्थिनी प्रतिनिधी पदासाठी दिव्या तातळे, ज्ञानेश्वरी डावरे व श्रुती नवले, तर विद्यार्थी प्रतिनिधी पदासाठी गणेश गोसावी व सिद्धेश गायकवाड हे उमेदवार होते. मतदानातून श्रुती नवले यांची विद्यार्थिनी प्रतिनिधी, तर गणेश गोसावी यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. विजयी उमेदवारांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व उमेदवारांचा सन्मान करण्यात आला.

महेश नवले यांनी, “आपण भविष्यातील सतर्क नागरिक असून लोकशाही बळकट करण्यासाठी तरुण पिढीसमोर मोठे आव्हान आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम व्हावे,” असे मत व्यक्त केले.

प्रशासकीय अधिकारी संतोष कचरे यांनी विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या निवडणूक उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक जागरूकपणे कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. नगरसेविका श्वेता रुपवते, उच्च माध्यमिक विभागाचे चेअरमन बाळासाहेब वडजे, हिं. से. मं. कार्यकारिणी सदस्य दिलीप शहा यांनी निवडून आलेल्या उमेदवारांचे अभिनंदन केले.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी प्रा. चंद्रभान नवले, सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रा. दत्ता सातपुते, प्रा. मंगल कोल्हे, प्रा. पंडित देशमुख व प्रा. मनोहर भागवत यांनी काम पाहिले. मतमोजणी अधिकारी म्हणून प्रा. संपत वाळके, प्रा. बबन कासार व प्रा. रोशनी नवले यांनी जबाबदारी सांभाळली. सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब भोत व प्रा. संदीप भोर यांनी केले. उपप्राचार्य प्रा. दीपक जोंधळे यांनी आभार मानले.

निवडणूक प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेवटच्या श्रावणी सोमवारनिमित्त संजीवनी युवा प्रतिष्ठानची गोदावरी महाआरती

## चौथ्या वर्षीही गोदातीर भक्तिमय | कोपरगावच्या सांस्कृतिक जडणघडणीत महाआरतीची मोलाची भर

**● कोपरगाव । वीरभूमी–**
संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने पवित्र श्रावणातील शेवटच्या अर्थात चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त कोपरगाव शहरातील लहान पूल परिसरातील गोदावरी नदीच्या तीरावर ‘गंगा गोदावरी महाआरती’चे आयोजन करण्यात आले. संत-महंतांचे सान्निध्य आणि असंख्य भाविकांच्या उपस्थितीत झालेल्या या महाआरतीमुळे गोदातीर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील तीन वर्षांपासून प्रतिष्ठानच्या वतीने ‘गंगा गोदावरी आरती’चे आयोजन करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे चौथे वर्ष होते. गोदावरी नदीप्रती श्रद्धा जपत धार्मिक परंपरा जोपासण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, दरवर्षी भाविकांचा या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी गोदावरी नदीच्या तीरावर ही महाआरती करण्यात आली.यावेळी गोदामाईची विधिवत महाआरती करून कोपरगाव शहरासह सर्वांच्या सुख-समृद्धी, उत्तम आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करण्यात आली. ‘हर हर महादेव’च्या जयघोषाने तसेच शंखनादाने संपूर्ण गोदावरी नदीचा परिसर भक्तिमय झाला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाआरतीत सहभाग घेतला.

यावेळी सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. रेखाताई गायकवाड यांचा ‘गोदावरी गंगा महात्म्य’ हा विशेष कार्यक्रम झाला. त्यांनी गोदावरी नदीचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व सांगत गोदामाईच्या महात्म्याचे विवेचन केले. त्यांच्या निरूपणाला उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महाआरतीच्या वेळी मंत्रोच्चार, शंखनाद आणि भक्तिगीतांनी गोदातीर दुमदुमून गेला. नदीकाठी करण्यात आलेल्या दीपप्रज्वलनामुळे परिसराचे वातावरण अधिकच प्रसन्न झाले होते.

पुढील वर्षी नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा होणार असल्याने गोदावरी नदीला यंदाच्या महाआरतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरीच्या धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्वात आणखी भर पडणार आहे. त्यामुळे कोपरगावातील गंगा गोदावरी महाआरतीचेही वेगळे महत्त्व अधोरेखित होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

यावेळी संत जनार्दन स्वामी आश्रमाचे मठाधिपती परमपूज्य रमेशगिरीजी महाराज, आत्मा मालिक ध्यानपिठाचे महंत परमपूज्य परमानंदगिरीजी महाराज, परमपूज्य उंडे महाराज, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन ज्ञानेश्वर परजणे, कोपरगाव शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उद्धव डमाळे, कोपरगाव तालुका पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, कोपरगाव नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी, संत-महंत, शिवभक्त, युवासेवक आणि असंख्य भाविकांनी उपस्थिती लावली.कोपरगावच्या सांस्कृतिक जडणघडणीत मोलाची भर घालणारी ही गंगा गोदावरी महाआरती ठरत असून, या उपक्रमामुळे शहराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर पडत आहे, अशी भावना कोपरगावकरांनी व्यक्त केली. संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या महाआरतीमुळे गोदावरी तीरावर श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS




## निघोज शाळेत विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका

**● निघोज । वीरभूमी–**

निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका व शिक्षकांच्या भूमिका साकारत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत अध्यापन केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी रुद्र साळवे याने मुख्याध्यापक, स्वरांजली उनवणे हिने उपमुख्याध्यापिका, तर अंकेश कुमार, आयुष ननवरे, फातिमा इनामदार, कार्तिक आल्हाट, प्रणाली मुंजाळ व आराध्या क्षीरसागर यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारल्या. मुख्याध्यापक देठे, ज्येष्ठ शिक्षक शिंदे व साबळे तसेच ज्येष्ठ शिक्षिका लंके आणि शिक्षिका लाळगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक देठे म्हणाले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे कार्य महान आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने त्यांची जयंती साजरी करताना विद्यार्थ्यांना शिक्षकांचे कार्य कसे असते, याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. शिक्षकांच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांना अध्यापनाचे प्रात्यक्षिक मिळणे हा उपक्रम शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निघोजची विद्यार्थीसंख्या वाढत असून, यावर्षी शाळेला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद व योगदान मिळत आहे. विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामान्यज्ञानासह शैक्षणिक व सांस्कृतिक माहिती मिळण्यास मदत होत असल्याचेही त्यांनी सांगितले. या उपक्रमाला गाव व परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट देऊन शिक्षक व विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## काशिनाथ मालुंजकर यांचे निधन

**● अकोले । वीरभूमी–**



तालुक्यातील रुंभोडी (मालुंजकर वाडी) येथील धार्मिक वृत्तीचे काशिनाथ गेणू मालुंजकर (वय ९०) यांचे आज मंगळवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ व चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अकोले येथील राजपुष्प फ्लेक्सचे संचालक राजेंद्र मालुंजकर, शिक्षक केशव मालुंजकर, खासगी कंपनीमध्ये सेवेत असणारे अरविंद मालुंजकर, लँड डेव्हलपर्स व शेतकरी बाळासाहेब मालुंजकर, सौ. उषा पंढरीनाथ आरोटे यांचे ते वडील होत. त्यांच्यावर रुंभोडी येथे प्रवरा तिथी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# अस्टरला भाव नाही; शेतकऱ्याचा संताप

**पावसाची दडी, पाण्याचे संकट अन् बाजारभावाची घसरण । शेतकऱ्याने उभ्या पिकावर फिरवला रोटर**

**● पारनेर । वीरभूमी–**



गेल्या तीन महिन्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने पारनेर तालुक्यातील शेतकरी पाण्याच्या गंभीर संकटाला सामोरे जात आहेत. जमिनीतील पाणीपातळी खालावल्याने विहिरी, तलाव, नद्या आणि कूपनलिका कोरड्या पडल्या आहेत. अशा प्रतिकूल परिस्थितीत मोठ्या कष्टाने उभे केलेल्या फुलपिकाला गणेशोत्सवाच्या तोंडावरही अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने पुणेवाडी येथील शेतकरी संतोष विठ्ठल रेपाळे यांनी संताप व्यक्त करत अस्टरच्या उभ्या पिकावर रोटर फिरवून ते जमिनीत गाडले.

गणेशोत्सवाच्या काळात फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे चांगला भाव मिळेल, या अपेक्षेने रेपाळे यांनी अस्टरची लागवड केली होती. लागवडीपासून मशागत, रोपे, खते, औषधफवारणी, मजुरी आणि पाण्यापर्यंत मोठा खर्च झाला. मात्र, पावसाने दडी मारल्याने पिकाला आवश्यक पाणी उपलब्ध करणे कठीण झाले. त्यातच बाजारात फुलांचे दर कमी राहिल्याने उत्पादन खर्चही भरून निघण्याची परिस्थिती राहिली नाही.

फुलशेतीमध्ये उत्पादनाबरोबरच तोडणी, वर्गीकरण, पॅकिंग आणि वाहतुकीचाही मोठा खर्च असतो. बाजारभाव घसरल्यास हा अतिरिक्त खर्चही वसूल होत नाही. त्यामुळे फुले बाजारात विक्रीसाठी नेण्यापेक्षा उभे पीक नष्ट करणे कमी नुकसानकारक ठरत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

खते, औषधे, मजुरी, वीज आणि पाण्याचा खर्च सातत्याने वाढत असताना शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. फुलशेती ही जोखमीची शेती असून हवामानातील बदल आणि बाजारभावातील चढ-उताराचा थेट परिणाम उत्पादकांवर होतो.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फुलांना चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा असतानाही दर कमी राहिल्याने फुल उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. सणासुदीच्या काळात तरी उत्पादनाला योग्य भाव मिळावा, तसेच फुल उत्पादकांसाठी बाजारपेठ, दरातील स्थिरता, पाणी उपलब्धता आणि नुकसानभरपाईबाबत शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

अस्टरच्या उभ्या पिकावर फिरवलेला रोटर हा केवळ एका शेतकऱ्याचा संताप नसून वाढता उत्पादन खर्च आणि कमी बाजारभावामुळे फुल उत्पादकांसमोर उभ्या राहिलेल्या आर्थिक संकटाचे बोलके चित्र ठरले आहे.

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहालय-स्नेहबंध रक्षाबंधन सोहळा उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

स्नेहालय-स्नेहबंध प्रकल्पाच्या वतीने संस्थेतून बाहेर पडलेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी ६ सप्टेंबर २०२६ रोजी रवींद्रनाथ टागोर हॉल, स्नेहालय येथे आगळावेगळ्या रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सुमारे ५० ते ६० माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एफबीसी प्रकल्पाच्या अपर्णा स्वामी व निशा घाडगे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागतगीताने वातावरण उत्साहपूर्ण झाले. शिक्षक दिनानिमित्त उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

स्नेहालयचे समाधान धालगुडे यांनी प्रास्ताविकातून स्नेहबंध प्रकल्पाच्या माध्यमातून माजी विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, विवाह तसेच विविध अडचणींमध्ये मार्गदर्शन व सहकार्य केले जात असल्याची माहिती दिली.

यूके स्नेहालयचे विश्वस्त निक कॉक्स यांनी माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी एकत्र आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. स्नेहालयचे कार्याध्यक्ष अनिल गावडे यांनी कुटुंबव्यवस्थेचे महत्त्व सांगत, संस्थेतून बाहेर पडल्यानंतरही सर्वांनी एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे आणि अडचणीच्या काळात परस्परांना मदत करावी, असे आवाहन केले.

स्नेहबंध प्रकल्पाचे प्रवीण राठोड म्हणाले की, रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा कार्यक्रम नसून माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींमधील प्रेम, आपुलकी आणि नातेसंबंध अधिक दृढ करणारा उपक्रम आहे.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी स्नेहालयशी असलेल्या भावनिक नात्याला उजाळा दिला. त्यानंतर त्यांनी एकमेकांना राखी बांधून प्रेम व विश्वासाचे नाते अधिक दृढ केले. मनोज अहिरे यांनी मुलांसाठी मनोरंजक खेळांचे आयोजन केले.

## पेडगाव-श्रीगोंदा रस्त्याचे रखडलेले काम पुन्हा सुरू

**आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाची हालचाल । पाठपुराव्याला यश**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



पेडगाव ते श्रीगोंदा (प्रजिमा-६२) या महत्त्वाच्या रस्त्याचे गेल्या दोन महिन्यांपासून रखडलेले काम अखेर पुन्हा सुरू झाले आहे. रस्ता खोदून काम अर्धवट सोडल्याने ग्रामस्थ, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. याप्रश्नी ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने हालचाली करत कामाला सुरुवात केली.

श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत ओगले तसेच पेडगाव, चोरीचीवाडी, अधोरेवाडी आणि नवनाथनगर येथील ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदन देत रस्त्याचे रखडलेले काम तातडीने सुरू करून पूर्ण करण्याची मागणी केली होती. काम सुरू न झाल्यास ८ सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, श्रीगोंदा येथे ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार ग्रामस्थांच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाची दखल घेत सार्वजनिक बांधकाम उपविभागाने ८ सप्टेंबर रोजी पत्राद्वारे रस्त्याचे काम पुन्हा सुरू करण्यात आल्याचे स्पष्ट केले. सद्यस्थितीत काम प्रगतिपथावर असून, खोदकाम केलेल्या लांबीपैकी एका बाजूचे काँक्रिटीकरण पूर्ण होईपर्यंत काम बंद ठेवले जाणार नसल्याचे विभागाने नमूद केले आहे.

रस्त्याचे काम पुन्हा सुरू झाल्याने ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. मात्र, काम दर्जेदार पद्धतीने आणि निर्धारित वेळेत पूर्ण करून नागरिकांना कायमस्वरूपी दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यावेळी संतोष शिंदे, भगवान कणसे, शहाजी खेडकर, संतोष भोईटे, सचिन गायकवाड, महेश दरेकर, शंकर कोठारी, मुजफ्फर मालजप्ते, सोहेल शेख, दादा काटकर, सचिन थिटे, अमोल भोसले, संदीप दहातोंडे, सुरज शेख, योगेश शेळके, शिवाजी नवले, विक्रम मरगज, ओंकार गोसावी, जहीर सय्यद यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पिंपळगाव टप्पा शाळेत चिमुकल्यांची दहीहंडी

**राधा-कृष्णाच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे नृत्य, दांडियाने रंगला उत्सव**

**● पाथर्डी । वीरभूमी –**




गोकुळाष्टमीनिमित्त पाथर्डी तालुक्यातील पिंपळगाव टप्पा जिल्हा परिषद शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहीहंडी उत्सव उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. राधा-कृष्णाच्या आकर्षक वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे नृत्य, दांडिया आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणाने शाळेच्या परिसरात जणू गोकुळ अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला.

विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या विविध बाललीला निरागस अभिनयातून साकारल्या. राधा-कृष्ण तसेच श्रीकृष्णाच्या सवंगड्यांच्या वेशभूषेतील चिमुकल्या कलाकारांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. पारंपरिक गीतांवरील नृत्य व दांडियाच्या सादरीकरणाला पालक आणि ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

यानंतर दहीहंडीचा उत्साहपूर्ण उपक्रम घेण्यात आला. बालगोपाळांनी एकमेकांना आधार देत तीन थरांचा मानवी मनोरा उभारला. त्यावर चढलेल्या चिमुकल्या अक्षज बाबर याने दहीहंडी फोडताच विद्यार्थ्यांनी जल्लोष केला. श्रीकृष्णाच्या जयघोषाने आणि टाळ्यांच्या कडकडाटाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक भास्कर दराडे यांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करून झाली. यावेळी शिक्षक परिमल बाबर यांनी भारतीय संस्कृती, परंपरा आणि श्रीकृष्णाच्या जीवनातील मूल्यांची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने शाळेत विविध उपक्रम राबविले जात असल्याचे सांगितले.

यावेळी शिक्षक परिमल बाबर, शिवाजी चव्हाण, प्रिती वीर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव आंधळे, समितीचे सदस्य-पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिमुकल्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक केले.

# अकोल्यात केबल चोरीच्या टोळीचा पर्दाफाश

**आठ आरोपी अटकेत । २ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले तालुक्यातील कोतुळ व पिंपळगाव खांड परिसरातील मुळा नदीपात्रातून शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींच्या केबल चोरी करणाऱ्या टोळीचा अकोले पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत आठ आरोपींना अटक करून सुमारे २ लाख ४१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोतुळ येथील शेतकरी दीपक गंगाधर देशमुख यांनी १७ ऑगस्ट २०२६ रोजी अकोले पोलिसांत फिर्याद दिली होती. १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० ते १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० या कालावधीत कोतुळ शिवारातील पळसुंदे येथील मुळा नदीपात्रातून त्यांच्या तसेच अन्य शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले होते. याप्रकरणी अकोले पोलिस ठाण्यात गु.र.नं. ५२२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३१७ (२), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार करण रामभाऊ मधे (२१, रा. पांगरी, ता. अकोले), किरण संतोष मधे (२४, रा. धांदरफळ बु., ता. संगमनेर), साहील बुधा गिहें (२२) व अविनाश कैलास मधे (२२, दोघे रा. एकलव्य नगर, नांदूर शिंगोटे, ता. सिन्नर, जि. नाशिक) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

चोरी केलेल्या केबलमधील तांब्याच्या तारा काढून त्या राजेंद्र सोमनाथ वर्षे (३२, रा. वरवंडो, ता. संगमनेर) याला दिल्याचे आरोपींनी सांगितले. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने तांब्याची तार गुलाम रसुल ईसाक शहा (४३, रा. आश्वी वा., ता. संगमनेर) याला विकल्याचे सांगितले. पुढील चौकशीत शहा याने हा मुद्देमाल अब्बास सुभान ताबोलो (६६, रा. चितळी रोड, राहता) आणि प्रशांत रामदास डमाळे (४३, रा. लोणी, ता. राहता) यांना विकल्याचे सांगितले.

पोलिसांच्या माहितीनुसार, चोरीचा मुद्देमाल वाहून नेण्यासाठी गुलाम रसुल ईसाक शहा याने स्विफ्ट कार व मोबाईलचा वापर केला होता. पोलिसांनी १० हजार रुपये किमतीचा विवो कंपनीचा मोबाईल आणि १ लाख ५० हजार रुपये किमतीची लाल रंगाची स्विफ्ट व्ही.डी.आय. कार (क्रमांक एमएच ४३ एक्स ६५०७) जप्त केली.

याशिवाय चोरीच्या केबलमधील सुमारे २६ किलो वजनाची, जळाल्याने काळपट झालेली तांब्याची तार (किंमत २६ हजार रुपये) आणि सुमारे ४६ किलो वजनाची तांब्याची तार (किंमत ५५ हजार २०० रुपये) अशा मुद्देमालाचाही जप्तीमध्ये समावेश आहे. पोलिसांनी एकूण २ लाख ४१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक, श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे आणि संगमनेर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अकोले पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप कोळी, सहायक पोलिस निरीक्षक संदीप हजारे, झडख समाधान फडोळ, पोहेकॉ अनिल जाधव, पोलिस कॉन्स्टेबल विजय फटांगरे, महेंद्र गुंजाळ, सुहास गोरे, अविनाश गोडगे, योगेश जोरगील, मंगेश बिडवे, मच्छिंद्र इंगळे तसेच अपर पोलिस अधीक्षक कार्यालय, श्रीरामपूर येथील सायबर सेलचे पोहेकॉ सचिन धनाड व पोहेकॉ वेताळ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीला कायमस्वरूपी दिलासा

## उड्डाणपुलासाठी ६५ कोटींचा निधी मंजूर । विखे पाटील, जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

**शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या डीएसपी चौकातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहराच्या वाढत्या वाहतुकीचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून डीएसपी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या कामाला गती मिळाली असून, या प्रकल्पासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने तसेच आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पाला दिशा मिळाली आहे.**



कोपरगाव-शिर्डी-कोल्हार-अहिल्यानगर या प्रमुख मार्गावरील डीएसपी चौक हा शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. संभाजीनगरकडून येणारी वाहने तसेच शिर्डी, कोपरगाव, कोल्हार आणि शहराच्या विविध भागांकडे जाणारी वाहतूक या चौकातून मोठ्या प्रमाणावर होते. वाढत्या वाहनसंख्येमुळे सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत येथे मोठी वाहतूक कोंडी होत होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने नागरिकांचा वेळ, इंधन आणि श्रम वाया जात होते.

शहराचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि वाहनांची संख्या लक्षात घेता भविष्यातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी सक्षम पायाभूत सुविधा उभारण्याची गरज डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी मांडली. डीएसपी चौकातील कोंडीवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

**उड्डाणपुलामुळे वाहतुकीचा ताण कमी होणार**

प्रस्तावित उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर डीएसपी चौकातील मुख्य वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. शिर्डी, कोपरगाव, कोल्हार तसेच अहिल्यानगर शहराच्या विविध भागांकडे जाणाऱ्या वाहनांना अधिक सुरळीत मार्ग उपलब्ध होईल. त्यामुळे चौकातील कोंडी कमी होऊन प्रवासाचा वेळ वाचण्यास मदत होणार आहे.

डीएसपी चौकातील कोंडीचा फटका कामगार, कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णवाहिका तसेच शहराबाहेर प्रवास करणाऱ्या नागरिकांना दररोज सहन करावा लागत होता. त्यामुळे उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील वेळ आणि त्रास कमी होण्याची अपेक्षा आहे.

अहिल्यानगर शहराचा वेगाने विस्तार होत असून, वाढती लोकसंख्या, वाहनसंख्या आणि शहराला जोडणाऱ्या प्रमुख मार्गांवरील वाहतूक लक्षात घेता भविष्यातील गरजांसाठी पायाभूत सुविधा सक्षम करणे आवश्यक झाले आहे. त्या दृष्टीने डीएसपी चौकातील उड्डाणपूल हा सध्याची वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच शहराच्या पुढील अनेक वर्षांच्या वाहतूक व्यवस्थेसाठी महत्त्वाचा प्रकल्प ठरणार आहे.

उड्डाणपुलासाठी निधी मंजूर झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच महायुती सरकारचे आभार डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले. शहराच्या वाढत्या गरजा आणि भविष्यातील वाहतुकीचा विचार करून शासनाने घेतलेला हा निर्णय अहिल्यानगरच्या विकासाला गती देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# प्रवरा विद्यालयात विद्यार्थ्यांनी सांभाळली शाळेची सूत्रे

## शिक्षक दिनानिमित्त इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी घेतला प्रत्यक्ष अनुभव

**● अकोले । वीरभूमी–**

तालुक्यातील इंदोरी येथील प्रवरा विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत वर्गात अध्यापन केले. तसेच शाळेच्या दैनंदिन व्यवस्थापनाची सूत्रे हाती घेत शिक्षकी पेशाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

विद्यार्थी सिद्धांत जीवन वाकचौरे यांनी मुख्याध्यापक, तर सोयल जितेंद्र पवार यांनी पर्यवेक्षकाची भूमिका पार पाडत दिवसभराच्या कामकाजाचे नियोजन केले. विद्यार्थी शिक्षिका मानवी संतोष देशमुख हिने प्रास्ताविक केले. अनुष्का अजित शिंदे व मानवी संतोष देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक रविंद्र कोंडार यांच्या सूचनेनुसार व सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षा शीतल बिबवे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**'तुम्ही उद्याच्या देशाचे शिल्पकार'**



विद्यार्थी शिक्षिका स्वरा श्रीराम हासे, सिद्धांत वाकचौरे आणि शिक्षक जालिंदर वाघ यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विशद केले. मार्गदर्शन करताना जालिंदर वाघ म्हणाले, "तुम्ही आज छोटे दिसत असलात, तरी उद्याचे देशाचे शिल्पकार आहात. तुमच्यापैकी कोणी डॉक्टर, इंजिनिअर, वैज्ञानिक, सैनिक किंवा उत्तम नागरिक बनेल. मोठे झाल्यानंतरही या वर्गखोलीत घालवलेले क्षण, शिक्षकांचे प्रेम आणि आदरयुक्त धाक विसरू नका.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व मुख्याध्यापक रविंद्र कोंडार यांनी शिक्षकाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले, "उत्तम शिक्षक शिकवतो, चांगला शिक्षक स्पष्ट करून सांगतो, उत्कृष्ट शिक्षक करून दाखवतो; परंतु महान शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात शिकण्याची आवड निर्माण करतो."

कार्यक्रमास बी. एम. भोजने, शहाजी मुंतोडे, जे. जी. वाघ, अमोल देशमुख, प्रसाद देशमुख, संदीप भरीतकर, शशिकांत चौधरी, सीमा धुमाळ, शीतल बिबवे, लक्ष्मी मुंढे, अरुण भोमले व राजेश बेनके यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

शेवटी विद्यार्थी शिक्षिका वेदिका प्रविण वामन यांनी उपस्थित शिक्षक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# ग्रामसभा अधिक सक्षम करण्यासाठी कायद्यात दुरुस्तीचा पाठपुरावा

## आमदार काशिनाथ दाते यांचे आश्वासन । तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे निवेदन

**● पारनेर । वीरभूमी–**

ग्रामसभा ही ग्रामीण लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ असून, तिची कार्यपद्धती अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध, पारदर्शक आणि निर्णयक्षम करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ७ तसेच ग्रामसभेच्या बैठकीसंदर्भातील नियमांचे पुनर्विलोकन करून आवश्यक कायदेशीर सुधारणा करण्यात याव्यात. यासाठी राज्य सरकारकडे प्रभावी पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या शिष्टमंडळाने पारनेर येथील कार्यालयात आमदार दाते यांची भेट घेऊन ग्रामसभांच्या विद्यमान कार्यपद्धतीत सुधारणा करण्याबाबत निवेदन सादर केले. यावेळी ग्रामसभेच्या कामकाजातील अडचणी, अधिकारी-कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याबाबत चर्चा झाली.

बदलत्या परिस्थितीत ग्रामसभेच्या विद्यमान कार्यपद्धतीचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. ग्रामसभा सुरू असताना अधिकारी-कर्मचाऱ्यांशी झालेल्या मारहाणीच्या घटना, तसेच काही ठिकाणी होणारे वाद, गोंधळ आणि तणावपूर्ण परिस्थिती यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे ग्रामसभा घेणारे अधिकारी, कर्मचारी तसेच ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी स्पष्ट कायदेशीर संरक्षण आणि आवश्यक प्रशासकीय उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे संघटनेने म्हटले.

ग्रामसभा बंद करणे हा संघटनेचा हेतू नसून, त्या अधिक सक्षम, सुरक्षित, पारदर्शक आणि प्रभावी करण्यासाठी कायदे व नियमांमध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी संघटनेची भूमिका आहे. निवेदनात संविधानातील अनुच्छेद २४३अ व संबंधित कायदे-नियमांचे पुनर्विलोकन, वारंवार स्वतंत्र ग्रामसभा घेण्याऐवजी वर्षातून एक सर्वसमावेशक ग्रामसभा घेण्याची व्यवस्था, डिजिटल ग्रामसभेला कायदेशीर मान्यता, वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी महाडीबीटीच्या माध्यमातून पारदर्शक लाभार्थी निवड आणि ग्रामपंचायत अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन आमदार दाते यांनी दिले. तसेच संघटनेच्या राज्यस्तरीय शिष्टमंडळाची मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यसचिव हरिश्चंद्र काळे, तालुकाध्यक्ष विशाल झावरे, तालुका सचिव शरद गायकवाड यांच्यासह संदीप माळी, प्रदीप कडूस, सुनील दरेकर, संतोष गायकवाड व तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

# शिंदेवाडी शाळेला लोकसहभागातून ४० बेंच

## 'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद । आठवडाभरात ६८ हजारांचा निधी संकलित

**● अकोले । वीरभूमी–**

'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' या अभिनव उपक्रमाला माजी विद्यार्थी, ग्रामस्थ व दात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवघ्या आठवडाभरात ६८ हजार रुपयांचा निधी उभारला. या लोकसहभागातून उपलब्ध झालेल्या ४० बेंचचे लोकार्पण गणोरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी येथे पोषण महा सप्ताह व दहीहंडी कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका वृषाली सुनील कडलग यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी १,७०० रुपये किमतीचा एक बेंच देण्याची 'माझे अभिमानास्पद पालकत्व' ही संकल्पना मांडली. यासाठी त्यांनी ऱ्खच्या मदतीने जनजागृती प्रतिमा तयार करून ती माजी विद्यार्थी व गावातील व्हॉट्सप ग्रुपवर प्रसारित केली. विद्यार्थ्यांसाठी बेंच देण्याचे आवाहन करण्यात आले.

या आवाहनाला सर्वप्रथम शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर यांचे बंधू रामकृष्ण दातीर यांनी प्रतिसाद दिला. स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात त्यांनी आपल्या आई संजीवनी यांच्या हस्ते २० हजार रुपयांची देणगी मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांच्याकडे सुपूर्द केली. त्यांच्या पुढाकारानंतर माजी विद्यार्थी व ग्रामस्थही पुढे सरसावले आणि अवघ्या आठवडाभरात ६८ हजार रुपयांचा निधी जमा झाला.

दहीहंडी व पोषण महा सप्ताहाचा कार्यक्रम सुरू असतानाच विद्यार्थ्यांसाठी बेंच घेऊन ट्रक शाळेत दाखल झाला. बेंच पाहताच विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. लोकसहभागातून साकारलेल्या या उपक्रमामुळे 'माझी शाळा, माझी जबाबदारी' ही भावना अधिक दृढ झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खिरवीरे बीटचे विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर माळवे होते. यावेळी देवठाण बीटचे विस्तार अधिकारी अनिल गायकवाड, केंद्रप्रमुख उत्तम गायकवाड, बालरोगतज्ज्ञ डॉ. नीलम शिंदे, डॉ. दिपाली पानसरे, स्नेहलता कडलग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापिका वृषाली कडलग यांनी प्रास्ताविकातून ऱ्खच्या माध्यमातून राबविलेल्या बेंच उपक्रमाची संकल्पना, लोकसहभागातून झालेला शाळेचा




विकास, उडठच्या माध्यमातून झालेली भौतिक प्रगती तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा मांडला. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'पणती' कवितेतील प्रकाशाच्या प्रतीकाचा संदर्भ देत समाजमनाच्या सहभागातून अंधःकार दूर करण्याचा विश्वास या प्रकल्पाने अधोरेखित केला असल्याचे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र जिजाऊ ब्रिगेड, संगमनेरच्या सदस्य डॉ. दिपाली पानसरे, डॉ. नीलम शिंदे व स्नेहलता कडलग यांच्या वतीने शाळेला टेबल व सहा खुर्च्या भेट देण्यात आल्या. 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत महिलांना केशर आंब्याची ५१ रोपे वितरित करण्यात आली. महिलांनी या रोपांचे संगोपन करण्याची प्रतिज्ञा केली. यावेळी संतुलित व सकस आहार तसेच मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेतील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-कुसुमाग्रज वाचनालयासाठी डॉ. नीलम शिंदे यांनी २५ गोष्टींची पुस्तके भेट दिली. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये राज्य व जिल्हास्तरावर उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल श्रावणी दिगंबर दातीर हिचा ज्ञानेश्वर माळवे यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

पोषण महा सप्ताहानिमित्त महिलांनी रानभाज्या, पालेभाज्या, फळभाज्या, मोड आलेली कडधान्ये, दुग्धजन्य पदार्थ, तिळाचे पदार्थ, आंबवून तयार केलेले पदार्थ व सुकामेवा अशा विविध पौष्टिक पदार्थांचे प्रदर्शन भरविले.

लक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर, ठाणावाला यांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना ३५ वह्या, सतरंजी व पेन तसेच अंगणवाडी विद्यार्थ्यांना कपडे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिगंबर दातीर, उपाध्यक्ष प्रियंका हांडे, समितीचे सदस्य, पालक, महिला, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी बालगोपाळांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. विद्यार्थी, महिला व ग्रामस्थांनी त्यात उत्साहाने सहभाग घेतला.

पोषण, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, तंत्रज्ञानाचा कल्पक वापर आणि लोकसहभाग यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम शिंदेवाडी शाळेच्या प्रगतिशील वाटचालीचा प्रेरणादायी नमुना ठरला. 'एका विद्यार्थ्यासाठी एक बेंच, माझे अभिमानास्पद पालकत्व' या उपक्रमातून समाजाने शाळेच्या विकासाची जबाबदारी स्वीकारल्याचे चित्र निर्माण झाले. आभार सहशिक्षिका कल्पना पाटील यांनी मानले.

### बेंच उपक्रमासाठी देणगीदार

■ रामकृष्ण दातीर २०,००० रुपये, प्रा. डॉ. अशोक मारुती दातीर ११,०००, प्रभाकर भीमाशंकर आहेर ५,१००, लताबाई भीमाशंकर आहेर ५,१००, ज्ञानेश्वर भीमाशंकर आहेर ५,१००, रावसाहेब रामभाऊ दातीर ५,०००, गोरक्षनाथ म्हातारबा दातीर ५,०००, प्रा. शरद तुपविहिरे ३,४००, रो. सुनील किसनराव कडलग ३,२००, प्राचार्य श्रीकांत माघाडे १,७००, रो. सुनील घुले १,७०० आणि रोटरी क्लब ऑफ संगमनेरचे प्रेसिडेंट रो. समीर शाह १,७०० यांनी योगदान दिले.